क्रमांक : ४

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## गुरुवार, दिनांक १९ जानेवारी, २०२३ / पौष २९, १९४४ (शके)

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

४. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन गुरुवार, दिनांक ०३ मार्च, २०२२ रोजी सुरु होऊन शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण १९४ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी ३८ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती व एकूण १५६ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. त्यापैकी ६६ लक्षवेधी सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली असून ९० प्रलंबित निवेदनांपैकी २२ निवेदने गुरुवार, दिनांक १२ मे, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आली आहेत. प्रलंबित ६८ निवेदनांपैकी १४ निवेदने गुरुवार, दिनांक २ जून, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आली आहेत. तसेच, प्रलंबित ५४ लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १२ निवेदने गुरुवार, दिनांक ३० जून, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. प्रलंबित ४२ निवेदनांपैकी १० निवेदने सोमवार, दिनांक १८ जुलै, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. प्रलंबित ३२ निवेदनांपैकी ५ निवेदने दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. प्रलंबित २७ निवेदनांपैकी १ निवेदने सोमवार, दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आले आहेत. त्यानंतर एकूण प्रलंबित २६ निवेदनांपैकी ७ निवेदने दिनांक १ डिसेंबर, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. आता एकूण १९ निवेदनांपैकी ११ निवेदन शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १९ जानेवारी, २०२३.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. झीशान सिद्दिकी,** वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

राज्यशासनाचे कोविड महामारीचे निर्बंध असताना देताना देखील मुंबईतील वांद्रे विभागात लसीकरणाचे बोगस प्रमाणपत्र दिले जात असल्याबाबत निर्मलनगर पोलिस ठाणे येथील तक्रार दाखल केली असताना बोगस प्रमाणपत्र जारी करण्यात आले असल्याचे डिसेंबर, २०२१ च्या दरम्यान निष्पन्न होणे, वांद्रे विभागातील सर्व १३ लसीकरण सेंटरचे हेड असलेले वरिष्ठ आरोग्य अधिकारी डॉ. सतिश बडगिरे यांनी अधिकाराचा गैरवापर करुन बोगस प्रमाणपत्र दिले असल्याचा संशय असतानाही त्यांची चौकशी करण्यात आलेली नसणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या तत्कालीन सहायक आयुक्त श्रीमती अलका ससाणे यांना या प्रकरणाची माहिती दिली असताना देखील कोणतीही कारवाई करण्यात न येणे, कोविड काळात नागरिकांना जिविताची भिती असताना देखील सर्रासपणे वरील प्रकार घडत असताना दुर्लक्ष केले जात असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना याबाबत राज्यशासनाने सखोल चौकशी करुन संबंधित वरिष्ठ अधिकारी डॉ. सतिश बडगिरे व सहाय्यक आयुक्त श्रीमती अलका ससाणे तसेच या प्रकरणातील इतर अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

दिनांक ०१.०९.२०२१ रोजी मुंबईतील खेरवाडी म्युनिसिपल चौकी पी-९५ लसीकरण केंद्र या ठिकाणी श्रीमती नम्रता पवार नामक व्यक्तीने लस घेतली नसताना सदर केंद्रावर त्यांच्या नावे लस घेतल्याबाबत प्रमाणपत्र तयार करण्यात आल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी निर्मल नगर पोलीस स्टेशन येथे तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने निर्मल नगर पोलीस स्टेशनमार्फत संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे जबाब घेण्यात आले.

मुंबईतील जीओ गार्डन लसीकरण केंद्र येथे ४५ वर्षांवरील व्यक्तींना लस देण्यात येत होती. तथापि सदर लसीकरण केंद्राच्या ठिकाणी श्रीमती नम्रता पवार, वय २४ वर्षे यांना लस देण्यात आली. श्रीमती नम्रता पवार यांना जीओ गार्डन लसीकरण केंद्र येथेच लसीकरण प्रमाणपत्र देणे शक्य नसल्यामुळे त्यांचे लसीकरणाचे प्रमाणपत्र खेरवाडी चौकी लसीकरण केंद्र येथून निर्गमित करण्यात आले. त्यामुळे जीओ गार्डन लसीकरण केंद्र येथील कंत्राटी तत्वावर कार्यरत संबंधित कर्मचाऱ्यांना सेवेतून काढून टाकण्यात आले आहे. सदर प्रकरणी बनावट लसीकरणाचे कोणतेही प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

निर्मल नगर पोलीस स्टेशनने केलेल्या चौकशीअंती वैद्यकीय आरोग्य अधिकारी (एच/पूर्व) यांनी अधिकाराचा गैरवापर करुन बोगस प्रमाणपत्र दिल्याचे आढळून आले नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

रोटा/एच-७७३[७५०-१-२३]. *******

CR 265_2022_BMC_C_01

लक्षवेधी सुचना क्रमांक :- ६९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, किशोर जोरगेवार, अबू आजमी, रईस शेख, ॲड. राहूल कुल, श्री. जयकुमार गोरे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सुचना क्रमांक ६९ पुढील प्रमाणे आहे :-

"राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षण टिकविण्यासाठी ओबीसी समाजाचा इम्पिरिकल डेटा गोळा करण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगास समर्पित आयोग म्हणून घोषित करण्यात येणे, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षण टिकवण्यासाठी इम्पिरिकल डेटा गोळा करण्याची जबाबदारी असलेल्या राज्य मागासवर्ग आयोगाने दिनांक २८ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास मुख्य सचिवांना पत्र लिहून डेटा गोळा करण्यासाठी निधी व कर्मचारी वर्ग पुरविण्याची विनंती केलेली असणे, या मागणीनुसार अद्याप एकही कर्मचारी आयोगाला उपलब्ध करून देण्यात आलेला नसणे, राज्य मागास आयोग आणि इतर मागास व बहुजन कल्याण विभाग यांच्यात एकवाक्यता नसणे, अर्थसंकल्पित ४३० कोटीपैकी निव्वळ ५ कोटी अद्यापपर्यंत आयोगाला उपलब्ध होणे, इम्पिरिकल डाटाअभावी निवडणूक आयोगाकडून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका ओबीसी आरक्षणाशिवाय पार पाडणे, दरम्यानच्या काळात शासनाकडे असलेला डेटा आयोगाकडे देऊन त्याची तपासणी करून अंतरिम अहवाल देण्यास व त्याआधारे आगामी महापालिकांच्या निवडणुका घेण्यास न्यायालयाने मान्यता दिलेली असणे, त्यानुसार आयोगाने अपुऱ्या मनुष्यबळावर व कमी मुदतीत अहोरात्र काम करून अंतरिम अहवाल तयार केलेला असणे, परंतु यापुढील सर्व निवडणूका ओबीसी आरक्षणासह घेण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाचा अंतिम अहवाल प्राप्त होणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने सांगितलेले असल्याने आयोगाला कर्मचारी व निधी पुरविणे अत्यावश्यक असणे, ओबीसी आरक्षणाचा लाभ सर्वच क्षेत्रातील नागरिकांना होणारा असल्यामुळे मागासवर्ग आयोगाचे अंतिम अहवालाचे काम जलद गतीने होण्यासाठी त्यांना तातडीने कर्मचारी वर्ग व निधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाची भूमिका व करावयाची तातडीची उपाययोजना."

.....................................................................................................................

मा. मंत्री (ग्राम विकास) श्री. गिरीष महाजन

<u>निवेदन</u>

मा. सर्वोच्च न्यायालयातील रिट याचिका क्र. ९८०/२०१९ श्री. विकास गवळी विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर यामध्ये दिनांक ४ मार्च, २०२१ मुख्यत: खालीलप्रमाणे आदेश पारीत केले आहेत .

i) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थानमध्ये मागासलेपणाचे स्वरूप व त्यावरील परिणामासाठी (empirical Data मिळवून ) एक समर्पित कमिशन स्थापन करणे ;

ii) आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांना आवश्यक असलेल्या आरक्षणाचे प्रमाण मर्यादित करणे जेणेकरून संवैधानिकतेचे उल्लंघन होणार नाही.

iii) कोणत्याही परिस्थितीत असे एकत्रित अनुसूचित जाती / जमाती / ओबीसींचे आरक्षण एकूण जागांच्या ५०% टक्के पेक्षा जास्त नसेल.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ४ मार्च, २०२१ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागाने दिनांक १५ जून, २०२१ रोजीच्या अधिसूचनेअन्वये महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगांच्या सदस्यांची नियुक्ती केली आहे. इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागाने दिनांक २९ जून, २०२१ रोजीच्या अधिसुचनेअन्वये सदर आयोगाची कार्यकक्षा अंतिम करुन त्यानुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदयस्थितीतील नागरिकांच्या मागास प्रवर्गाचे स्वरुप, परिणाम यांचे काटेकोरपणे अभ्यास करण्यास सुचित केले आहे. त्याचबरोबर अभिलेखे अहवाल, सर्वेक्षण आणि इतर उपलब्ध माहितीच्या आधारे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांच्या मागासवर्गीयांचे एकुण लोकसंख्येशी असलेले प्रमाण निश्चित करण्याची जबाबदारी आयोगाला पार पाडणेची आहे.

राज्य मागासवर्ग आयोगाने दिनांक २८ जुलै, २०२१ रोजीच्या पत्रान्वये स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाशी संबंधित विनिर्दिष्ट कामे पार पाडण्यासाठी अंदाजे ४३५ कोटी रुपयांची मागणी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र यांच्याकडे केलेली आहे. सदरमागणी ही मुख्यत: इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या अख्यत्यारीतीतील आहे. तथापि सदर बाब ही या विभागाशी संबंधित नसल्याने त्यावर विभागाचे अभिप्राय देणे उचित होणार नाही.

तथापि मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६ /२०२१ व इतर मधील दिनांक १९ जानेवारी, २०२२ रोजीच्या आदेशामध्ये राज्य शासनाकडे उपलब्ध असलेल्या माहितीचा विश्लेषाणात्मक अभ्यास करून दोन आठवड्याच्या आत अंतरिम अहवाल तयार करण्यास राज्य मागास वर्ग आयोगास निर्देश दिले होते. त्यानुषंगाने राज्य मागास वर्ग आयोगाने दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२२ रोजी राज्य शासनास अंतरिम अहवाल सादर केला होता.

श्री. विकास गवळी यांनी राज्य मागासवर्ग आयोगाने सादर केलेल्या अंतरीम अहवालावर आक्षेप घेवून मा. सर्वोच्च न्यायालयात याचिका क्र. १४१/२०२२ दाखल केली. सदर याचिकेत राज्य मागासवर्ग आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय अनुभवजन्य अभ्यास (empirical study) न पार पाडता, तिहेरी चाचणी (triple test) मुलभुत तत्वांचे पालन न करणे, राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग कायदा, २००५ अन्वये अस्तित्वात असलेल्याच आयोगाला समर्पित आयोग घोषित करणे इत्यादी कारणांनी अंतरीम अहवाल नाकारला आहे.

सबब, उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता, राज्य शासनाने दिनांक २९ जून, २०२१ व दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजीच्या अधिसूचनेन्वये निश्चित केलेली राज्य मागास वर्ग आयोगाची कार्यकक्षा रद्द

करण्यासाठी उचित कार्यवाही करावी. त्यासाठी खालीलप्रमाणे मंत्रिपरिषदेने दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी निर्देश दिले.

१. मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ९८०/२०१९ व विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ यांमध्ये दिलेल्या आदेशानुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरीकांच्या मागास प्रवर्गास आरक्षण उपलब्ध करुन देताना आदेशात नमुद असलेल्या तिहेरी चाचणी (Triple Test) चे अनुपालन करण्यासाठी श्री. जयंतकुमार बांटीया, माजी मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य तथा माजी जनगणना आयुक्त केंद्र सरकार यांच्या अध्यक्षतेखाली विधि व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार नव्याने समर्पित आयोग गठीत करावे.
२. आयोगात विधि व कायदातज्ञ, विषयाशी निगडीत प्रशासन सेवेतील अनुभवी अधिकारी, अंतराष्ट्रीय जनसंख्या विज्ञान संस्था (IIPS), टाटा सामाजिक विज्ञान संस्था (TISS) इत्यादी नामांकित संस्थांचे प्रतिनिधी हे आयोगाच्या अध्यक्षांच्या सल्लामसलतीने नियुक्त करण्यात येतील. आयोगाचे सचिव हे ग्राम विकास विभागामार्फत नियुक्त करण्यात येतील. तसेच सदरचा आयोग हा ग्राम विकास विभाग व नगर विकास विभाग यांच्या संयुक्तपणे सनियंत्रणाखाली असेल.
३. सदर आयोग हा मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ९८०/२०१९ व विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ यांमध्ये दिलेल्या आदेशानुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरीकांच्या मागास प्रवर्गाचे राजकीय मागासलेपणाचे स्वरुप आणि परिणाम यांची काटेकोरपणे तपासणी करुन अहवाल सादर करेल असे निर्देश मंत्रिपरिषदेने दिले आहे.

उपरोक्त आदेशास अनुसरुन राज्यातील नागरिकांच्या मागासवर्गाच्या (इतर मागासवर्गाच्या) बाबतीत स्थानिक स्वराज्य संस्थांनिहाय राजकीय मागासलेपणाच्या स्वरुपाची व परिणामांची समकालीन अनुभवधिष्ठीत सखोल चौकशी करण्यासाठी श्री. जयंतकुमार बांठिया, माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११ मार्च, २०२२ रोजीच्या आदेशान्वये समर्पित आयोग स्थापन करण्यात आला होता.

सदर आयोगाच्या वित्तीय बाबी (मानधन, भत्ते, प्रवासखर्च, कार्यालयीन खर्च व अनुषंगिक बाबी) हया वित्त विभागाने अनौपचारीक संदर्भ ६१/२२/कोप्र५ व ११९/२२/व्यय- १५ अन्वये ग्राम विकास विभागाच्या अधिपत्त्याखाली लेखाशिर्ष २०५३ ०५२९ जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूका (१३) कार्यालयीन खर्च यामध्ये आर्थिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये केलेली अर्थसंकल्पीय तरतुदीमधुन समर्पित आयोगाच्या वित्तीय बाबींसाठी खर्च करण्यास मान्यता दिलेली आहे.

त्याअनुषंगाने विभागाच्या दिनांक १७ मार्च, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयोगाच्या वित्तीय बाबी व अनुषंगिक खर्च इत्यादींसाठी मान्यता देण्यात आली आहे. तसेच दिनांक २२ मार्च, २०२२

रोजीच्या ज्ञापनान्वये आयोगास रुपये २५ कोटी इतकी रक्कम समर्पित आयोगाच्या बँक खात्यामध्ये वर्ग करण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ९८०/२०१९ च्या आदेशात राज्यातील नागरीकांच्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणासाठी दिलेल्या निर्देशाप्रमाणे या विभागाने गठीत केलेल्या समर्पित आयोगास दिनांक १७ जून, २०२२ रोजीच्या अधिसुचनेन्वये दिनांक ११ जुलै, २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

मध्यप्रदेश राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत रिट याचिका २७८/२०२१ मधील दिनांक १८ मे, २०२२ रोजीच्या आदेशामध्ये मध्य प्रदेश राज्यात इतर मागासवर्गीयांना आरक्षण देण्याबाबत आदेशित करण्यात आले.

उपरोक्त आदेशाच्या धर्तीवर समर्पित आयोगाने दिनांक १९ मे, २०२२ रोजीच्या पत्रान्वये मतदार यादयांचा वापर करुन नागरीकांच्या मागास वर्गीयांची सांख्यिकी माहिती संकलीत करुन समर्पित आयोगास सादर करण्यास कळविले.

दिनांक १ जून, २०२२ रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अंतर्गत असलेल्या मतदान केंद्रांच्या ग्रामपंचायतनिहाय मतदार यादी संगणक प्रणालीव्दारे उपलब्ध करुन देण्याबाबतची प्रायोगिक प्रणालीचे सादरीकरण केले व सर्व उपस्थितांनी त्यास सहमती दर्शविली. तसेच सदर बैठकीत नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय नागरीकांच्या मागास प्रवर्गातील निश्चित करण्याकामी करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचे सनियंत्रण व समन्वय श्री. राजेश कुमार, अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग यांच्या मार्फत करण्याचा निर्णय झाला.

राज्यातील एकुण २८८ विधानसभा मतदार संघ अंतर्गत ९६३५१ मतदान केंद्रांची जोडणी ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय करण्यासाठी संगणक प्रणाली विकसीत करुन नागरीकांच्या मागास प्रवर्गाची माहिती संकलीत करण्यात आली.

उपरोक्त माहिती संकलीत करुन दिनांक २१ जून, २०२२ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या मान्यतेने समर्पित आयोगास सादर करण्यात आली.

सदर माहितीच्या आधारावर समर्पित आयोगाने दिनांक ७ जुलै, २०२२ रोजी राज्य शासनास अहवाल सादर केला.

सदर अहवाल श्री. राजेश कुमार, अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग यांनी तयार केलेल्या प्रतिज्ञापत्राव्दारे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक १२ जुलै, २०२२ रोजीच्या सुनावणीस सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे सादर करण्यात आला.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २० जुलै, २०२२ रोजीची सुनावणीत सदर अहवाल स्विकारुन तिहेरी चाचणीची पुर्तता केल्याने राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरीकांच्या मागास प्रवर्गास आरक्षण लागु करण्यास सहमती दर्शविली.

**************

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, अतुल भातखळकर, सुनील राणे, अबू आजमी, वि.स.स.** यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे :-

"मुंबई पालिकेने सफाई कामगारांच्या ३९ वसाहतींच्या पुनर्विकासासाठी आश्रय योजना राबवण्याचे ठरविले असणे, ही योजना कार्यान्वित होण्यासाठी १,८४४ कोटी रूपयांचे प्रस्तावही आतापर्यंत पालिकेत मंजूर झालेले असणे, सदर योजनेच्या कामास ३३ लाख चौ.फु. बांधकाम मंजूर असताना त्यात ७९ लाख चौ.फु.पर्यंत वाढ करून पालिकेची मान्यता घेणे, मुंबईतील सफाई कामगारांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजेतून मालकी हक्काची घरे देणे शक्य असतांनाही महापालिकेने मालकी हक्काची घरे देण्याऐवजी आश्रय योजनेच्या नावाखाली "सेवा निवासस्थानाचा" पर्याय सफाई कामगारांना देणे, याबाबत लोकप्रतिनिधींनी मुख्यमंत्री व पालिका आयुक्त यांच्याकडे लेखी तक्रार केलेली असणे, मात्र त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, या नव्या निर्णयामुळे योजना खर्चातही अनेक पटीने वाढ झालेली असणे, निविदा ही ठिकाविक कंत्राटदारांना काम मिळेल अशा पध्दतीनेच तयार करण्यात आलेल्या असणे, कामागारांच्या वसाहतींच्या पुनर्विकासात बांधकामाचा खर्च ४,८६० रुपये प्रति चौ.फु. दाखवला जाणे, मात्र शासनाच्या एसआरए योजनेमध्ये दिल्याजाणा-या घरांसाठी हाच दर १,५०० रुपये एवढा असणे, सरकार आणि महापालिकेचे प्रत्येकी ५० टक्के अनुदान देऊन सफाई कामगारांना मालकी हक्काने घरे देता येऊ शकणे, परंतु पालिकेनेच ही योजना स्वतः कार्यान्वित करावयाचे ठरविल्याने सदर योजनेच्या अंमलबजावणी बाबत संशयाचे वातावरण तयार होणे, त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून चौकशीत दोषी आढळणा-यांवर कडक कारवाई करून आश्रय योजनेअंतर्गत सफाई कामगारांच्या वसाहतींचा पुनर्विकास करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

### -: <u>मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u> :-

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांच्या वसाहती या सन १९६० च्या जवळपास बांधण्यात आल्या आहेत. सदर वसाहती अतिशय जीर्ण झाल्यामुळे तसेच, सफाई कामगारांच्या सेवानिवासस्थानांचा साठा वाढविण्याकरीता वसाहतींची पुनर्बांधणी होणे आवश्यक आहे. यास्तव, ३० वसाहतींचा कमाल ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक वापरुन आश्रय योजनेअंतर्गत सफाई कामगारांना किमान ३०० चौ.फुट इतक्या वाढीव क्षेत्रफळाची सेवानिवासस्थाने देण्याकरीता पुर्नविकास करण्याचे महानगरपालिकेने नियोजिले आहे. त्याकरिता महानगरपालिकेमार्फत रु. ३५०० कोटी रुपयांचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत.

सदर वसाहतींचे आराखडे त्यांना अनुज्ञेय असलेल्या त्या त्या ठीकाणच्या चटईक्षेत्रानुसार तयार करण्यात आले. तथापी, सफाई कामगारांच्या सर्व वसाहतींचा आश्रय योजने अंतर्गत Design and Built Turnkey Basis वर निविदा काढण्याचा निर्णय झाल्यावर एक आधाररेषा म्हणून ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक वापरून क्षेत्रफळ निश्चित करण्यात आले. तथापी, कंत्राटदारांनी आराखडे सादर करताना प्रत्येक ठीकाणच्या वसाहतींसाठी लागू असलेले अधिकतम चटईक्षेत्र व फंजिबल चटईक्षेत्र गृहित धरुन आराखडे सादर केले. तसेच, विकास नियंत्रण नियमावलीनुसार इमारतींमधील काही क्षेत्र हे चटईक्षेत्रात गणण्यात येत नाही, तसेच, नवीन विकास नियंत्रण

नियमावलीनुसार काही निर्बंध शिथील झाल्यामुळे काही ठिकाणी पूर्ण चटईक्षेत्र व फंजिबल चटईक्षेत्र वापरणे शक्य झाले अशा विविध कारणांमुळे एकूण बांधकामक्षेत्रात वाढ झाली आहे. तथापी, महानगरपालिकेने अंतिमत: मंजूर केलेले क्षेत्रफळच अंतिम व बंधनकारक राहणार असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन खात्यातील एकूण सफाई कामगारांपैकी अंदाजे १९ टक्के कामगार सेवासदनिकामध्ये राहतात. त्यामुळे या वसाहतींचा आश्रय योजनेअंतर्गत पुनर्विकास करुन अंदाजे १२००० सेवासदनिका बांधण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत सफाई कामगारांसाठी मालकी हक्काची घरे बांधण्याकरिता महानगरपालिकेकडे पुरेशी जागा उपलब्ध नसल्यामुळे प्रथमत: सेवानिवासस्थाने उपलब्ध करुन देणे उचित राहिल. तद्नंतर, बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत जागा उपलब्ध झाल्यास डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेअंतर्गत मालकी हक्काच्या सदनिकांसाठी प्रक्रिया राबविणे शक्य होणार असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर प्रकरणी लोकप्रतिनिधींनीकडून प्राप्त झालेल्या पत्रांना महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी उत्तरे देण्यात आली आहेत.

आश्रय योजनेअंतर्गत तयार करण्यात आलेल्या निविदा, सार्वजनिक जाहिरातीद्वारे वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देऊन तसेच सदर कामे ई-निविदा पध्दतीने महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात आल्या होत्या. सदर निविदांना मिळणारा अल्प प्रतिसाद पाहता स्पर्धात्मक निविदा प्राप्त होण्यासाठी वारंवार मुदतवाढ देण्यात आली होती.

सदर निविदा डिझाईन आणि बिल्ट टर्नकी पध्दतीच्या आहेत. त्यामध्ये नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदाराला कामाचे आराखडे, डिझाईन, संकल्पचित्रे बनविणे अपेक्षित असून कंत्राटदाराने बांधकामासाठी आवश्यक असणाऱ्या किनारा नियमन क्षेत्र (सी.आर.झेड.), नागरी हवाई वाहतूक, लोहमार्ग, एम.ओ.ई.एफ., नौसेना प्राधिकरण, मुंबई ऐतिहासिक संवर्धन समिती (एम.एच.सी.सी.), अग्निशमन यंत्रणा, तसेच महापालिका, शासकीय, निमशासकीय व इतर संबंधित विभागांच्या मंजूरी/ना-हरकत प्रमाणपत्रे प्राप्त करावयाची आहेत. त्यानुसार मंजूर आराखडे रेखांकने, संरचनात्मक आराखडे सादर करुन बांधकाम करणे बंधनकारक आहे. तसेच या प्रकल्पांमध्ये विकसित करण्यात येणा-या इमारतींच्या अंतर्गत व आवारातील अंतर्गत रस्ते व त्यांच्या दिवाबत्ती सुविधा, अंतर्गत जलवाहिन्या, मलनिसारण वाहिन्या करमणूक / खेळाची मैदाने, प्रार्थना स्थळे, समाजकेंद्र इत्यादी सोईसुविधांचा समावेश करुन कंत्राटदाराने दर देणे अपेक्षित आहे. त्यानुसार कंत्राटदाराने सर्व बाबी गृहित धरुन त्याप्रमाणे दर उद्धृत केले आहेत.

आश्रय योजनेअंतर्गत प्रस्तावित पुनर्विकास करावयाच्या इमारतींव्यतिरिक्त कंत्राटदारास, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाप्रमाणे TDR/FSI/ बाजारभावानुसार सदनिका तयार करून विक्री करणे असे कोणतेही व्यावसायिक लाभ मिळणार नाही असे महानगरपालिकेने कळविले आहे.

*******

एच-७८४-१अ.

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्रीमती मनिषा चौधरी, ॲड. राहुल नार्वेकर, मा.वि.स.स.** यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे :-

**"अग्निशमन दलाने मुंबईतील १,१४९ रुग्णालयांच्या घेतलेल्या झाडाझडतीत तब्बल ४० रुग्णालयांनी सुरक्षेचे नियम धाब्यावर बसविल्याची धक्कादायक बाब उजेडात आली असणे, महापालिकेने मुंबईतील सर्व रुग्णालयांचे फायर ऑडिट केले असणे, यामध्ये १,१४९ रुग्णालयांची तपासणी केली असता, ३४२ ठिकाणी सर्व यंत्रणा नियमानुसार असल्याचे दिसून येणे, तर १२८ रूग्णालये बंद असणे, ६३९ रुग्णालयांमध्ये किरकोळ दुरुस्त्या करण्याचे आवश्यक असणे, ४० रूग्णालयांच्या इमारतीबाहेर पडण्याच्या रस्त्यांमध्ये अडगळ, अग्निरोधक यंत्रणा बंद असणे आदी निष्काळजी आढळून आली असणे, मुंबईतील बहुतांश रुग्णालयामध्ये अग्निरोधक यंत्रणा कार्यान्वित नसणे, फायर एक्सटिंगुडशेरसारख्या अनेक गोष्टी नसणे, आपत्तीकाळात बाहेर पडण्याच्या मार्गात अडथळे असणे, अशा पध्दतीने सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवून रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरु असल्यामुळे सर्वसामान्य नागरीकांमध्ये संतापाची भावना मोठ्या प्रमाणात निर्माण होणे, रुग्णालयामध्ये सुरक्षेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तसेच उपाययोजना व राज्य शासनाची प्रतिक्रिया."**

### -: मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील एकूण १,५७४ रुग्णालये / प्रसृतीगृहे / नर्सिंग होम (१,५१७ खाजगी व ५७ शासकिय / निमशासकिय) यांची अग्निसुरक्षा विषयक तपासणी करण्यात आली होती. त्यापैकी ६८७ रुग्णालयांमध्ये अग्निसुरक्षेविषयक अटी व शर्तींच्या त्रुटी आढळुन आल्याने महानगरपालिकेमार्फत त्यांना, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मधील तरतूदीनुसार 'फॉर्म जे' नोटीस पाठवुन विहीत मुदतीत आवश्यक ती पुर्तता करण्याबाबत निर्देशित करण्यात आले होते. त्यापैकी ६६३ रुग्णालयांनी सदर नोटीसमध्ये दिलेल्या त्रुटींची पुर्तता विहीत कालावधीत केली आहे. उर्वरीत २४ रुग्णालयांनी अग्निसुरक्षा विषयक अटी व शर्तींची पुर्तता विहीत वेळेत केली नसल्याने त्यांच्यावर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अन्वये महानगरपालिकेमार्फत कारवाई सुरु आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ च्या कलम ३ (३) नुसार, इमारतीचे मालक/भोगवटादार यांनी इमारतीमधील अग्निप्रतिबंधक यंत्रणा सुस्थितीत असल्याची माहिती प्रपत्र 'ब' द्वारे लायसन्स प्राप्त अभिकरणामार्फत अग्निशमन दलास वर्षातून दोन वेळा माहे जानेवारी व जुलै महिन्यात सादर करणे बंधनकारक आहे. तसेच महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मध्ये, इमारतीमधील विद्युत प्रणालीचे लेखा परिक्षण करण्याची तरतुद नसल्यामुळे इमारतींमधील विद्युत प्रणालीचे लेखा परिक्षण करण्याकरीता महानगरपालिकेमार्फत राज्याचे मुख्य विद्युत निरीक्षक यांना कळविण्यात आले आहे.

*******

रोटा/एच-७८०-१-२३]·

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, अबू आजमी, रईस शेख, मा. वि.स.स.** यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे :-

**"मुंबई महापालिकेच्या मराठी, हिंदी, इंग्रजी आणि ऊर्दू माध्यमातील शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या इयत्ता दहावीच्या मुलांसाठी १९४०१ टॅब खरेदी केले जाणार असणे, या टॅबच्या स्क्रीनचा आकार, बॅटरी लाईफ, रॅम, मेमरी, इंटरनेट सुविधा, सॉफ्टवेअर आवृत्ती, लर्निंग सॉफ्टवेअर, टॅबचा दर्जा, त्याची तांत्रिक वैशिष्ट्ये, तसेच संबंधित कंपनीच्या माहितीचा तपशील याबाबत प्रस्तावात काहीही स्पष्टता नसणे, टॅबची ही योजना २०१५ मध्ये सुरु करण्यात आली असून त्यावेळी एका टॅबची किंमत ६८५० रुपये तर २०२१ साली हीच किंमत साधारणत: २० हजार रुपये निश्चित करण्यात आली असून या खरेदीत मोठी तफावत दिसून येणे, इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना हे टॅब पुढील दोन महिन्यांनंतर हातात मिळणार असून येत्या मार्चमध्ये बोर्डाच्या परीक्षा होईपर्यंत ते वापरण्यासाठी जेमतेम एक महिना उरणार असणे, सुमारे एक महिना इतक्या कमी कालावधीसाठी हे टॅब खरेदी केले जाणार असणे, पूर्वीच्या टॅब खरेदीच्या तुलनेत अधिक पैसे खर्च करुनही यंदा विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या शेवटी कमी कालावधीसाठी टॅब उपलब्ध होणार असणे, टॅबची वाढीव किंमत, तांत्रिक तपशीलाचा अभाव तसेच शैक्षणिक वर्षाचा उर्वरित कमी कालावधी पाहता या निर्णयाचा पुनर्विचार करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."**

-: <u>मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u> :-

बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेतील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांकरीता सन २०२१-२०२२ मध्ये १९४०१ टॅब एक वर्ष अधिक चार वर्षांच्या ज्यादा वॉरंटीसह म्हणजेच सन २०२२ ते २०२७ या पाच वर्षांसाठी खरेदीची ई-निविदा बृहन्मुंबई महानगपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन राबविण्यात आली आहे. सदरच्या निविदा मसुद्यामध्ये टॅबच्या स्क्रीनचा आकार, बॅटरी लाईफ, रॅम, मेमरी, इंटरनेट सुविधा, सॉफ्टवेअर आवृत्ती, लर्निंग सॉफ्टवेअर, टॅबचा दर्जा त्याची तांत्रिक वैशिष्ट्ये इत्यादी तपशील समाविष्ट आहे.

यापूर्वी खरेदी करण्यात आलेल्या टॅबच्या किंमतीशी आता खरेदी करण्यात आलेल्या टॅबच्या किंमतीची तुलना केली असता, सन २०१५ साली खरेदी केलेल्या टॅबची किंमत ६८५० रुपये होती. तर सध्या खरेदी केलेल्या टॅबची मूळ किंमत सुमारे १२००० रुपये इतकी आहे व ही किंमत पाच वर्षाचा अभ्यासक्रम, एक वर्ष अधीक चार वर्षाची जादा वारंटी व १८% जीएसटी सह सुमार १९९०० रुपये आहे.

यापूर्वी खरेदी करण्यात आलेले टॅब हे एक वर्ष अधिक दोन वर्षांच्या वॉरंटीसह होते. तर सद्यस्थितीत घेण्यात येणारे टॅब हे एक वर्ष अधी चार वर्षांच्या वॉरंटीसह आहे. तसेच सदर खरेदीमध्ये चार ते सहा वर्षांचा कालावधी लोटलेला आहे.

सदरच्या कालावधीत इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या किंमती वाढलेल्या आहेत व सद्यस्थितीत घेण्यात येणारे टॅब हे एकूण ५ वर्षांच्या परिरक्षणासह असून अद्ययावत व आधुनिक वैशिष्टये (Features) तसेच अभ्यासक्रम अंतर्भुत असलेले आहेत. या टॅबमध्ये इंटरनेट/वाय-फायची सुविधा उपलब्ध करण्यात आली असून चांगल्या कंपनीचे Software व अद्ययावत कंटेंटह (Question Bank, MCQ's & E-Platform) व उच्चतम क्षमतेची बॅटरी इत्यादीचा समावेश आहे. सदर टॅब मध्ये LMS (Learning Management System) घेण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांने टॅबचा किती वापर केला हे शिक्षकांना कळणार आहे. त्यामुळे सद्यस्थितीत खरेदी करण्यात येणाऱ्या टॅबची किंमत वाढलेली दिसते.

नवीन खरेदी करण्यात येणारे टॅब हे शाळेमध्ये अध्ययन व अध्यापनाकरीता देण्यात येणार आहेत. या टॅबचा फायदा या वर्षी दहावीला असणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबरच पुढील पाच वर्षे, दरवर्षी नवीन येणाऱ्या इयत्ता १० वीच्या पाच बॅचच्या विद्यार्थ्यांना होणार आहे. त्याचप्रमाणे सद्यस्थितीत इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी यापूर्वी खरेदी करण्यात आलेले टॅब शाळेमध्ये उपलब्ध आहेत.

*******

एच–७८२–१३.

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, अबू आजमी, रईस शेख,** वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"प्रिन्सेस स्ट्रीट ते वरळी या कोस्टल रोड प्रकल्पाच्या कामासंदर्भात वरळी येथील समुद्रातील पुलाच्या दोन पिलरमधील अंतर ६० मीटर ऐवजी २०० मीटर ठेवण्याची मागणी स्थानिक मच्छीमारांकडून करण्यात आलेली असणे, येथील पाणी स्थिर नसल्याने बोटी डगमगतात, कमी अंतरामुळे मच्छिमारांच्या बोटी ये-जा करण्यामध्ये अडथळा होत असल्याने सदर मागणी करण्यात येणे, या मागणीच्या अनुषंगाने गेल्या दोन महिन्यात मच्छीमारांकडून अनेक वेळा आंदोलन करुन काम बंद पाडण्यात आलेले असणे, कोळी बांधवांनीच तज्ञ आणि सक्षम प्राधिकरण संस्थेकडून पिलरच्या अंतराबाबत अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा, असा उलटा सल्ला पालिकेच्या अधिकाऱ्यांकडून मच्छीमारांना देण्यात आलेला असणे, सागरी किनारा सेतूच्या खांबांमधील ६० मीटर अंतरामुळे मासेमारीला धोका निर्माण होईल हे सिद्ध करणारा अहवाल सादर करण्यासाठीची पालिकेने मच्छीमारांना दिलेली १५ दिवसांची मुदत संपलेली असणे, त्याबाबतचे पत्र पालिकेने मच्छीमारांना पाठविल्याने उभयतांमधील संघर्ष अधिक तीव्र होणे, तीन वर्षापासून सुरु असलेल्या कामामध्ये मच्छिमारांच्या मागणीचा तीन वर्षात विचार न करता आता १५ दिवसात अहवाल आणावयास सांगणे उचित नसल्याचे मच्छिमार संघटनांचे म्हणणे असणे, मच्छीमारांनी प्राधिकरणाकडून मान्यताप्राप्त सर्वेक्षण अहवाल आणावा, असे महापालिकेचे म्हणणे असणे परंतु मान्यताप्राप्त प्राधिकरण शासनाच्या अधीन असल्याने मच्छीमारांची याबाबत कोंडी झालेली असणे, सागरी किनारा मार्गाच्या सर्वेक्षणासाठी त्या त्या विषयातील तज्ज्ञांकडून सल्ला घेणे आवश्यक असणे, त्यांनी दिलेला अहवाल पालिकेला सादर करणे यासाठीचा १५ दिवसात अहवाल देणे कठिण असल्याचे मच्छीमारांचे म्हणणे असणे, मच्छिमारांच्या मागणीच्या अनुषंगाने सदर कामाच्या आराखड्यात बदल करण्याच्या दृष्टीने शासनाकडून अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### -: मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-

केंद्रीय पर्यावरण खात्याने दिनांक ११ मे, २०१७ रोजी दिलेल्या सीआरझेड मान्यता पत्रामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने मान्य केल्याप्रमाणे मच्छिमारांच्या बोटी जाऊ शकतील एवढ्या अंतराचे नौकानयन स्पॅन असलेले पूल बांधावे असे नमूद केले आहे. त्यानुसार वरळी येथील प्रस्तावित पुलाच्या नेव्हिगेशन स्पॅनच्या खांबांमधील अंतर हे ६० मीटर म्हणजेच २०० फूट आहे. सद्य:स्थितीत मच्छीमारांसाठी अस्तित्वात असलेल्या वांद्रे-वरळी जोड रस्त्यांच्या वरळी क्लिवलँड जेट्टीवरुन निघणाऱ्या बोटींना जाण्यासाठी एकच मार्गिका उपलब्ध असून त्या मार्गिकेतील दोन खांबांमधील निव्वळ अंतर (Clear Span) हे केवळ १७ मीटर आहे. मुंबई किनारी रस्ता प्रकल्पामध्ये ३ जलमार्गिका उपलब्ध असून त्यातील दोन खांबांमधील निव्वळ अंतर ५६ मीटर आहे जे सध्या उपलब्ध असलेल्या रुंदीपेक्षा तिप्पटीहून जास्त आहे.

राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्था यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार आयएस: ४६५१ मधील तरतुदींनुसार बोटीच्या एकेरी वाहतूकीसाठी बोटीच्या रुंदीच्या ५ पट आणि दुहेरी वाहतूकीसाठी

बोटीच्या रुंदीच्या ८ पट नेव्हिगेशन स्पॅन असणे आवश्यक आहे. शासनाच्या मत्स्य व्यवसाय विभागाने दिलेल्या पत्रानुसार वरळी जेट्टी येथील मोठया आकाराच्या परवानाधारक नौकेची लांबी १०.४ मीटर व रुंदी ३.८ मीटर असून माल वाहून नेण्याची क्षमता ४९८० किलो आहे. यानुसार दुहेरी वाहतूकीसाठी नेव्हिगेशन स्पॅन जास्तीत जास्त ३०.४ मीटर इतका ठेवणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र सागरी मंडळ यांनी दिलेल्या इनलॅण्ड वॉटरवेज ऑथोरिटी ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार ३० मीटर इतका नेव्हिगेशन स्पॅन पुरेसा आहे. मुंबई किनारी रस्ता प्रकल्पात ६० मीटर म्हणजे जवळ-जवळ दुप्पट नेव्हिगेशन स्पॅन ठेवण्यात आले आहेत.

मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) प्रकल्पाच्या कामास प्रत्यक्ष माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये सुरवात झाली. तोपर्यंत कोणत्याही मच्छिमार संस्थेने कोस्टल रोडच्या दोन खांबांमधील अंतर २०० मीटर असावे अशी मागणी केल्याचे आढळून येत नाही. तद्नंतर मच्छीमारांनी मुंबई उच्च न्यायालयात प्रकल्पाविरोधात याचिका दाखल केली होती. सदर यचिकेबाबत ६० मीटर नेव्हिगेशन स्पॅन पुरेसे असल्याचे शपथपत्र व याचिकेच्या सुनावणीदरम्यान कोळी बांधवांना द्यावयाच्या नुकसान भरपाईबाबत एक कृती आराखडा बृहन्मुंबई महानगरपालिकेने मा. उच्च न्यायालयास सादर केलेले आहेत.

मा. उच्च न्यायालयाने सदर याचिकेसोबतच्या इतर पाच जनहित याचिकांच्या दिनांक १६.०७.२०१९ रोजीच्या एकत्रित निकालात सांगितलेल्या एनव्हायरमेंट क्लिअरन्स (Environment Clearance) बाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले असून मा. सर्वोच्च न्यायालयातदेखील मच्छीमारांनी त्यांचे म्हणणे मांडले आहे. सर्व याचिकाकर्त्यांचे म्हणणे ऐकल्यानंतर मा. सर्वोच्च न्यायलयने दिनांक १७.१२.२०१९ रोजी आणि दिनांक ०७.१०.२०२० रोजीच्या आदेशानुसार मुंबई किनारी रस्ता प्रकल्पासाठी लागणारी जागा पुर्नप्रापण (Reclaim) करण्यास व रस्ता बांधण्यास व तो रस्ता संरक्षित ठेवण्यास मान्यता दिली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार एमसीझेडएमएने महानगरपालिकेने केलेल्या अमेन्डमेंट इन सीआरझेड एन.ओ.सी. च्या अर्जासंबंधित बैठकीमध्ये याचिकाकर्त्यांचे म्हणणे ऐकून, सदर बैठकीत असे स्पष्ट केले की ३२ मीटर नेव्हिगेशन स्पॅन दुहेरी बोट वाहतुकीस पुरेसा आहे. तरी देखील चार बोटी जाऊ शकतील असे ६० मीटर नेव्हिगेशन स्पॅन बृहन्मुंबई महानगरपालिकेने ठेवले आहेत.

अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे) यांच्या अध्यक्षतेखाली मच्छिमार पुनर्वसन मुल्यांकन समिती गठीत केली आहे. सदर कमिटीस मदत करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वर्किंग गृप तयार केला असून, सदर वर्किंग ग्रुपने दिनांक ०८.१०.२०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मच्छीमारांना समुद्रातील पुलाच्या कामाबाबत अवगत करण्यात आले आहे. तसेच आयुक्त, बृहन्मुंबई महापालिका यांनी मच्छिमार प्रतिनिधी सोबत दिनांक ०१.११.२०२१ रोजी झालेल्या बैठकीत, पुरेश्या रुंदीच्या नेव्हिगेशन स्पॅनची तरतूद प्रकल्पात असल्याचे व प्रकल्प बांधणीच्या काळात होणाऱ्या मच्छिमारांच्या नुकसानीची भरपाई देण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

मा. मंत्री (पर्यावरण, पर्यटन आणि राजशिष्टाचार) यांनी दिनांक ०६.०१.२०२२ रोजी महानगरपालिका अधिकारी आणि मच्छिमारांच्या दोन्ही संबंधीत सोसायटयांचे पदाधिकारी आणि सभासद यांचेसमवेत व्हिडीओ कॉन्फरंसींगद्वारे घेतलेल्या संयुक्त बैठकीमध्ये, कोस्टल रोड प्रकल्पाचे वांद्रे-वरळी सागरी सेतूला जोडणाऱ्या पुलाच्या पिलर १ ते पिलर ५ पर्यंतचे काम सुरु करणे आणि मच्छिमार बांधव सदर काम पूर्ण करण्यासाठी पूर्णपणे सहकार्य करतील, तसेच पिलर ६ पुढील २०० मीटर नेव्हीगेशन स्पॅनच्या मागणीबाबत, सदर २०० मीटर अंतराची मागणी तांत्रिकदृष्टया योग्य असल्याचे सिद्ध करण्यासाठी या क्षेत्रातील नामांकित तज्ञ संस्थेचे अहवाल संबंधीत मच्छिमार सोसायट्या १५ दिवसांमध्ये सादर करतील असे ठरले.

तथापि संबंधित मच्छिमार सोसायटयांनी एक महिन्यांपेक्षा जास्त विलंबाने बिगर मानांकित संस्थेचा अहवाल बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केला आहे. सदर अहवालात राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्था (NIO) यांनी किनारी रस्ता प्रकल्पासाठी माहे जुलै २०१७ मध्ये तयार केलेल्या "समुद्र लाटा, कमाल पाण्याची पातळी, वादळी लाटा, त्सुनामीच्या लाटांची उंची आणि समुद्रतळाशी होणारे बदल" या अभ्यास अहवालाची माहिती व संदर्भ घेतल्याचा उल्लेख करुन वादळी लाटा विचारात घेऊन बोटींच्या सुरक्षित वाहतुकीसाठी दोन पिलर मधील कमीत कमी अंतर १६० मीटर असण्याची आवश्यकता असल्याचे नमूद केले आहे. तथापि त्याबाबतचे संपूर्णपणे वैज्ञानिक विश्लेषण अहवालामध्ये आढळत नाही. सदर अहवाल राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्था (NIO) यांच्या अभिप्रायार्थ पाठविण्यात आला असून, अहवाल प्राप्त झाल्यानंतर यासंदर्भात गुणवत्तेनुसार पुढील कार्यवाही करता येईल.

*********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, सुनील राणे, अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. पराग शाह, योगेश सागर, सुभाष देशमुख, राम कदम, सदा सरवणकर, गणपत गायकवाड,** वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"दि. २६ जुलै, २००५ रोजी संततधार पावसामुळे मुंबईत आलेला महापुर आणि मिठी नदीने धारण केलेले रौद्ररुप पुन्हा अनुभवास येऊ नये यासाठी मिठी नदीच्या खोलीकरणासह रुंदीकरणासाठी मुंबई महानगरपालिका आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने आजमितीस १ हजार १५० कोटी रुपये खर्च करण्यात येणे, परंतु अद्याप मिठी नदी गाळातच असून दुसरीकडे मिठी नदीच्या संरक्षक भिंतीसह सर्व्हिस रोडची कामेही अपूर्णावस्थेत असणे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि पालिकेच्या हद्दीतील कामे अर्धवट असतांनाही १ हजार १५० कोटी रुपये कंत्राटदारांना देण्यात येणे, मिठी नदीच्या खोलीकरणासह रुंदीकरण व सर्व्हिसरोड तसेच संरक्षक भिंतीची कामे रखडले असूनही शासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असणे, अद्यापपर्यंत पूर्ण झालेल्या कामाचे ऑडीट करुन शिल्लक असलेली कामे शीघ्रगतीने हाती घेऊन युध्दपातळीवर पूर्ण करण्याची आवश्यकता व करावयाची तातडीची कार्यवाही."

<u>मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u>

दिनांक २६ जुलै, २००५ रोजी संततधार पावसामुळे मुंबईत आलेल्या महापुराला प्रतिसाद म्हणून मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची स्थापना केली. त्यानुसार केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र, पुणे आणि डॉ. चितळे समिती (सत्यशोधक समिती) यांच्या सूचनेनुसार मिठी नदीचे रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षक भिंत व सेवा रस्ता बांधण्याची कामे बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेमार्फत सुरु करण्यात आली.

मिठी नदीच्या १७ किमी. लांबीपैकी ११ किमी. (फिल्टरपाडा ते सीएसटीपूल, कुर्ला) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत येत असून, उर्वरित ६ किमी. (सीएसटीपूल, कुर्ला ते माहिम कॉजवे) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अखत्यारीत येते. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील मिठी नदीचे रुंदीकरण व खोलीकरणाची कामे दोन टप्प्यांत करण्यात आली आहेत:-

<u>टप्पा-१</u>

यामध्ये मिठी नदीचे रुंदीकरण व गाळ काढणे इ. कामे अंतर्भूत होती. सदर कामाचा कालावधी माहे एप्रिल, २००६ ते माहे जून, २००६ पर्यंत होता. टप्पा-१ अंतर्गतची १००% कामे पूर्ण झाली असून, त्यादरम्यान मिठी नदीचे १६ ते ६० मीटर रुंदीकरण पूर्ण झालेले आहे.

**टप्पा-२**

यामध्ये मिठी नदी विकास व संरक्षक प्राधिकरणामार्फत निश्चित केलेल्या शिफारशीनुसार नदीचे उर्वरित रुंदीकरणाचे व केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र यांचया शिफारशीनुसार नदीच्या खोलीकरण करण्याचे काम प्रामुख्याने अंतर्भूत केले असून, मिठी नदीच्या दोन्ही तीरांवर संरक्षक भिंत बांधणे व आवश्यकतेनुसार सेवा रस्ता बांधण्याचे काम अंतर्भूत आहे. टप्पा-२ मधील कामांना माहे एप्रिल, २००७ पासून सुरुवात करण्यात आली असून, त्याअंतर्गत मिठी नदीचे २० ते १०० मीटर इतके रुंदीकरण करण्याचे काम प्रस्तावित आहे. आजमितीस मिठी नदीचे रुंदीकरण व खोलीकरणाचे ९५%, संरक्षक भिंत बांधण्याचे ८०% व सेवा रस्ता बांधण्याचे ३०% पूर्ण झाले असून, उर्वरित रुंदीकरण व खोलीकरण करण्याच्या कामामध्ये बाधीत होत असणाऱ्या बांधकामांवर व अतिक्रमणांवर कारवाई करण्याचे काम देखील बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रगतीपथावर आहे.

मिठी नदी विकास प्रकल्प टप्पा-१ व टप्पा-२ अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुमारे रु. ६७५.९७ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अखत्यारीतील मिठी नदीच्या ६ किमी. लांबी व वाकोला नाल्याच्या १.८ किमी. लांबीमध्ये करावयाच्या विकास कामांची विभागणी २ टप्प्यांमध्ये करण्यात आली आहे. सदर कामांमध्ये रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षक भिंत व सुशोभिकरण इ. कामांचा समावेश करण्यात आला आहे.

**टप्पा-१**

मिठी नदी व वाकोला नाल्यामधून गाळ काढण्याची व शक्य तेथे रुंदीकरण करण्याची सुमारे रु. ३४.५० कोटी खर्चाची कामे माहे मार्च, २००६ ते जून, २००६ मध्ये पूर्ण करण्यात आली आहेत.

**टप्पा-२**

मिठी नदीचे सरासरी रुंदीकरण ३० मी. व वाकोला नाल्याचे सरासरी रुंदीकरण १० मी. एवढे करण्यात आले आहे. तसेच टप्पा-१ चे काम पूर्ण झाल्यामुळे नदीची जलवहन क्षमता आणि जलधारण क्षमता १.५ पटीने वाढली असल्यामुळे पाण्याचा निचरा जलद होऊन प्रदुषण कमी झाल्याने पर्यावरणामध्ये सुधारणा झाली आहे.

टप्पा-२ च्या कामाची प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु. ५७०.७६ कोटी इतकी असून, त्यापैकी रु. ५०३.९० कोटी इतका खर्च झाला आहे. मिठी नदी विकास व संरक्षक प्राधिकरणाने

दिनांक २५ मे, २०१० रोजी झालेल्या ६ व्या बैठकीत मिठी नदी व वाकोला नाल्याच्या सीमांकन आराखड्यास मंजुरी दिल्याप्रमाणे मिठी नदी व वाकोला नाल्याचे रुंदीकरणाचे काम जवळपास पूर्ण झाले असून, खोलीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. टप्पा-२ चे काम पूर्ण झाल्यानंतर मिठी नदीची वहन क्षमता तिपटीने व जलधारण क्षमता दुपटीने वाढल्याबाबत अहवाल सी.डब्ल्यू.पी.आर.एस., पुणे या संस्थेने दिनांक ११ नोव्हेंबर, २०११ रोजी दिला आहे. तसेच सदर कामामुळे मिठी नदीचे प्रदुषण बऱ्याच प्रमाणात कमी होऊन पर्यावरणामध्ये सुधारणा झाली आहे.

मिठी नदी तसेच वाकोला नाल्याच्या संरक्षक भिंतीची व सेवा पथकांची कामे तसेच रस्त्याची व सुशोभिकरणाची कामे पूर्ण झाली असून, उर्वरित कामांची कार्यवाही मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्र. १०४६३ च्या निर्णयानुसार करण्यात येणार आहे. आजमितीस एकूण प्रकल्पाची कामे ९२% पूर्ण झाली असून, टप्पा-१ व टप्पा-२ मध्ये एकूण ३७४७ झोपड्यांचे निष्कासन करुन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत राष्ट्रीय हरीत लवादाच्या याचिका क्रमांक ७/२०१५ मधील निर्णयानुसार मिठी नदी कामे स्थगित ठेवण्यात आली आहेत. सदर निर्णयाला मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले असून, मा. न्यायालयाच्या निर्णयानुसार पुढील कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्याचे ठरले असल्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने कळविले आहे.

*********

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यू पवार, वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

मुंबई महानगरपालिकेच्या जिजामाता उद्यान व प्राणी संग्रहालयाच्या आधुनिकीकरणाच्या प्रकल्पाच्या निविदांमध्ये अनियमितता झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असणे, शंभर कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या निविदेमध्ये विदेशी कंपन्याही सहभागी होऊ शकत असल्यामुळे, अशा विदेशी कंपन्या सहभागी होऊ नयेत म्हणून १८५ कोटी अंदाजित रकमेच्या निविदेचे ९१ कोटी व ९४ कोटी अशा अंदाजित रकमांच्या निविदांमध्ये दोन भाग करण्यात आलेले असणे, याआधी महापालिकेच्या रस्ते व इतर कामांसाठी निविदा भरणा-या कंपन्यांनीच आता जिजामाता उद्यानातील कंत्राटेही मिळविण्यासाठी पुढाकार घेतल्याने संशय व्यक्त केला जात असणे, ९१ कोटी अंदाजित रकमेच्या कामासाठी १४६ कोटींची तर ९४ कोटींच्या अंदाजित कामासाठी १४६ कोटींची निविदा भरण्यात आलेली असणे, अशा प्रकारे एकूण १८५ कोटींच्या अंदाजित कामासाठी २९२ कोटी म्हणजेच १०७ कोटी रुपयांचा अधिकचा खर्च महापालिकेला करावा लागणार असणे, या निविदांमध्ये अनियमितता झाली असल्याचा आरोप मुंबईच्या पालकमंत्र्यांनीही केला असणे, या सर्व प्रकरणाची चौकशी, चौकशीचे निष्कर्ष तसेच दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली हे स्पष्ट होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### -: मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जिजामाता उद्यान व प्राणी संग्रहालयाच्या आधुनिकीकरणाच्या प्रकल्पाच्या निविदांमध्ये अनियमितता झाल्याबाबतच्या तक्रारी महानगरपालिकेस प्राप्त झाल्या होत्या. परंतु सदर निविदा ई-निविदा प्रक्रियेनुसारच पार पाडण्यात आल्या आहेत. सदर निविदेची प्रक्रिया पार पाडताना निविदेमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्टॅण्डर्ड बिड डॉक्युमेंटनुसार विदेशी कंपनीला एखाद्या निविदेमध्ये सहभागी व्हायचे असल्यास विदेशी कंपनीने भारतीय कंपनीबरोबर संयुक्त उपक्रमाच्या माध्यमाने त्या निविदेत सहभागी होऊ शकतात. या संयुक्त उपक्रमामध्ये भारतीय कंपनीचा सहभाग कमीतकमी ५१% टक्के असणे गरजेचे आहे. सदर तरतुदीच्या अनुषंगाने या निविदेत सुद्धा विदेशी कंपन्यांना भारतीय कंपन्यांसोबत संयुक्त उपक्रमास मुभा देण्यात आली होती. त्यानुसार सदर निविदा विदेशी वृत्तपत्रांमध्ये सुद्धा प्रकाशित करण्यात आली होती. त्यामुळे निविदेतील अटींनुसार विदेशी कंपन्या सुद्धा निविदेमध्ये सहभागी होऊ शकत होत्या.

सदर निविदा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संचालक (प्राणिसंग्रहालय) यांच्या आवश्यकतेनुसार व सक्षम अधिकारी यांच्या मान्यतेनुसार दोन आर.एफ.पी. मध्ये विभागण्यात

आल्या होत्या. त्यानुसार सदर प्राणिसंग्रहालयाच्या सुविधेचे काम लवकरात लवकर पूर्ण होऊन मुंबईच्या जनतेस त्याचा लाभ मिळेल या धारणेने दोन स्वतंत्र कंत्राटदार नियुक्ती करण्याचे योजिले होते.

सदर निविदा ई-निविदा पध्दतीने मागविण्यात आली असल्यामुळे सदर निविदा नोंदणीकृत कंत्राटदारांस भरण्याची मुभा देण्यात आली होती. त्यामुळे यापूर्वी महापालिकेच्या रस्ते व इतर कामांसाठी निविदा भरणाऱ्या कंपन्यांनीच आता जिजामाता उद्यानातील कंत्राटेही मिळविण्यासाठी पुढाकार घेतला हे खरे नाही.

सदर दोनही निविदांमध्ये आर.एफ.पी.-I निविदेची अंदाजित रक्कम रु. ९१.५३ कोटी व आर.एफ.पी.-II निविदेची अंदाजित रक्कम रु. ९४.३७ कोटी ही अनामत ठेव रक्कम भरण्यासाठीची तरतूद होती. कारण सदर निविदेमध्ये बी.ओ.क्यु. व अंदाजपत्रक अंतर्भूत नव्हते. तरी निविदा भरताना कंत्राटदारांनी त्यांच्या सल्लागाराच्या मदतीने नियोजन, संकल्पचित्रे व संकल्पना व अंदाजपत्र बनवून आपला प्रस्ताव व बोलीची किंमत बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर करावयाची होती. त्यामुळे मे. हायवे कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याकडून प्राप्त झालेल्या आर.एफ.पी.-I या निविदेची लघुत्तम किंमत रु. १४६.६१ कोटी होती व मे. स्कायवे इन्फ्राप्रोजेक्टस् प्रा. लि. यांच्याकडून प्राप्त झालेल्या आर.एफ.पी.-II या निविदेची लघुत्तम किंमत रु. १४५.८८ कोटी ही त्यांनी तयार केलेल्या संकल्पचित्र आणि संकल्पनेनुसार (designing and concept) नुसार भरली होती.

सदर निविदेमधील तरतूदीनुसार सदर कंत्राटदारांना वाटाघाटीसाठी पाचारण केले असता त्यांनी आर.एफ.पी.-I व आर.एफ.पी.-II या निविदांची किंमत अनुक्रमे रु. १३५.७२ कोटी व रु. १३५.८८ कोटी अशाप्रकारे बोली कमी करण्याची तयारी दर्शविली होती. परंतु सदर वाटाघाटीमध्ये नमूद केलेली रक्कम मूळ निविदेच्या अंदाजित रक्कमेपेक्षा जास्त असल्यामुळे आयुक्तांच्या मान्यतेने सदर निविदा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे मे. स्कायवे इन्फ्राप्रोजेक्टस् प्रा. लि. आणि मे. हायवे कन्स्ट्रक्शन कंपनी यांना निविदा रद्द करण्यात आल्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच सदर निविदा पुनःश्च तीन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

*********

रावि-७८१-१३.

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. झीशान सिद्दिकी, मा. वि.स.स.** यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे :-

**"मुंबई महानगरपालिकेमध्ये स्थापत्य कंत्राट कामातील निविदा प्रक्रियेत झालेल्या घोटाळा प्रकरणाची चौकशी अहवाल सप्टेंबर-२०२१ रोजी जाहिर झालेला असून या अहवालामध्ये महानगरपालिकेतील ६३ अभियंता व कर्मचारी यांना दोषी ठरविण्यात आलेले असून या दोषी अभियंता व कर्मचाऱ्यांवर अद्याप पर्यंत महानगरपालिकेकडून कोणत्याही स्वरुपाची कारवाई न झाल्यामुळे मुंबईतील नागरिकांमध्ये या प्रकारामुळे पसरलेली असंतोषाची भावना याबाबत राज्यशासनाने तातडीने चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया."**

### -: <u>मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u> :-

दिनांक ०५ मार्च, २०१४ रोजीची, "किरकोळ स्थापत्य कामे (सी.डब्ल्यू.सी.) ई-कोटेशन तारांकित/अतारांकित बिल्डिंगमधील अनियमितता" या विषयाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस तक्रार प्राप्त झाल्यानंतर सदर तक्रारीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'चाचणी लेखा परिक्षा व दक्षता अधिकारी' यांनी तपासणी करुन दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजी अहवाल सादर केला असता आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक ०६ सप्टेंबर, २०१४ रोजी प्राथमिक चौकशी करण्याचे आदेश पारित केले आहे.

तद्नुषंगाने दिनांक २७ नोव्हेंबर, २०१४ रोजी सादर झालेल्या प्राथमिक चौकशी अहवालावर खात्यांतर्गत चौकशीचे आदेश पारित करण्यात आले व त्यानुसार त्रिसदस्यीय चौकशी समितीने ८३ कर्मचाऱ्यांवर आरोपपत्र बजावून खात्यांतर्गत चौकशी केली.

सदर समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालावर आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये ८३ कर्मचाऱ्यांपैकी २० कर्मचाऱ्यांबाबतीत दोषमुक्तीचे, ५० कर्मचाऱ्यांबाबतीत किरकोळ स्वरुपाच्या शिक्षेचे आदेश पारित केले आहेत. तसेच उर्वरीत १३ कर्मचाऱ्यांबाबतीत जबर शिक्षेचे आदेश पारित केले.

किरकोळ शिक्षा केलेल्या ५० कर्मचाऱ्यांपैकी ३० कर्मचाऱ्यांनी त्यांच्या शिक्षादेशाविरुध्द सादर केलेल्या अपिल अर्जाच्या अनुषंगाने ४ कर्मचाऱ्यांना दोषमुक्त करुन १३ कर्मचाऱ्यांच्या किरकोळ शिक्षेत बदल करण्यात आला. उर्वरित १३ कर्मचाऱ्यांच्या किरकोळ शिक्षा कायम करण्यात आल्या.

तसेच जबर शिक्षा झालेल्या उपरोक्त १३ कर्मचाऱ्यांवर 'कारणे दाखवा नोटीस' बजाविण्यात आली. तद्नंतर एका कर्मचाऱ्याचे निधन झाल्याने, त्याचे आरोपपत्र वगळण्याचे आदेश पारित केले. उर्वरित १२ कर्मचाऱ्यांपैकी ०७ कर्मचाऱ्यांच्या शिक्षा कायम करण्यात आल्या. तर ०५ कर्मचारी कार्यकारी अभियंता या पदाचे असल्याने, त्यांच्या शिक्षा देण्यास स्थायी समिती सक्षम प्राधिकारी असल्याने, त्यांच्या शिक्षेसंदर्भात स्थायी समितीस प्रस्ताव सादर केल्यानंतर स्थायी समितीने पारित केलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

*******

रोटा/एम-७८५[७५०-१-२३].

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**मा. श्री. अनिल बाबर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८१ पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्यातील वस्त्रोद्योग व यंत्रमागाची वीज सवलत स्थगित ठेवण्याचे निर्देश महावितरणने जारी केल्यामुळे राज्यातील सुमारे २२०० कोटी रुपयांची वीज सवलत बंद होणे, महावितरणने वस्त्र उद्योगाची वीज सवलत बंद केल्यामुळे राज्यात संतप्त प्रतिक्रिया उमटल्यामुळे वस्त्रोदयोग मंत्र्यांनी माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये राज्यातील २७ अश्वशक्तीपेक्षा अधिक वीज जोडभार वापराची सवलत पुन्हा सुरु करण्याची केलेली घोषणा, सदर घोषणा करुन एक महिन्याचा कालावधी उलटत नाही तो २७ अश्वशक्तिपेक्षा कमी जोडभार तसेच मोठया वस्त्रोदयोगाची सवलत बंद करण्यात येणे, मागील ३२ वर्षापासून यंत्रमागासाठी वीज सवलत दिली जात असतांना महावितरणने अचानक वीज सवलत स्थगित ठेवण्याचे दिलेले निर्देश, यासंदर्भात महावितरणाच्या मुख्य अभियंत्यानी १ मार्च, २०२२ रोजीच्या ई-मेल द्वारे सवलतीचे वीज बिल वितरण थांबविण्यात दिलेले आदेश, त्यामुळे यंत्रमागधारक व वस्त्रोदयोगाना विजेची बिले पूर्ण रक्कमेने भरावी लागणार असल्याने त्यांच्यात निर्माण झालेले चितेंचे वातावरण, सदर निर्णयाचा सर्वाधिक फटका वस्त्रोद्योगाला बसणे, यंत्रमागधारक व वस्त्रोद्योगधारकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण पाहता शासनाने याबाबत गांभीर्याने लक्ष घालून शासन स्तरावर कार्यवाही करुन राज्यातील २७ अश्वशक्तीपेक्षा अधिक वीज जोडभार वापराची सवलत सुरु करण्याबाबत व वस्त्रोद्योग व यंत्रमागधारकाची वीज सवलत स्थगित उठविण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

## मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

वस्त्रोद्योग घटकांना वीज सवलत शासनाने दि. २१/१२/२०१८ पासून लागू केली आहे. सदर सवलतीचे लाभ घेण्यासाठी शासनाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे दि.२१/१२/२०१८ पासून यंत्रमाग घटकांना नोंदणी करण्यासाठी वेळोवेळी दि. ०७/०१/२०२२ पर्यंत मुदत वाढ दिलेली आहे. शासनाचे धोरण ठरवितांना किती वस्त्रोद्योग घटक आहे याबाबची माहिती शासनाकडे उपलब्ध असते, परंतु २७ अश्वशक्तिपेक्षा कमी व जास्तचे जोडभार असलेले यंत्रमाग घटकांनी नोंदणी न केल्यामुळे सदर माहिती वस्त्रोद्योग विभागाकडे उपलब्ध नाही. तसेच यंत्रमागाच्या नावाखाली अन्य उद्योग या सवलतीचे लाभ घेत असल्याच्या अनेक तक्रारी शासनास आल्या होत्या त्यामुळे यंत्रमाग घटकांनी वीज सवलत मिळण्यासाठी शासनाकडे ऑनलाईन नोंदणी करणे बंधनकारक होते. वारंवार मुदत देऊन देखील वस्त्रोद्योग प्रकल्प नोंदणी करीत नसल्याने ज्या वस्त्रोउद्योग घटकांनी आयुक्त वस्त्रोद्योग यांचे संकेतस्थळावर नोंदणी केलेली नाही त्यांची वीज सवलत थांबविण्याच्या सूचना आयुक्त, वस्त्रोउद्योग यांनी दि. २९/१२/२०२१ च्या पत्रान्वये महावितरणला दिलेल्या होत्या. त्यामुळे जानेवारी, २०२२ या महिन्याचे वीज देयके, शासनाकडून मिळणारी वीज सवलत वजा न करता पूर्ण रक्कमेची आलेली आहेत.

यंत्रमागांची सवलत बंद झाल्यामुळे त्यांना विविध अडचणी आल्या होत्या व त्यांच्या व्यवसायावर विपरीत परिणाम होत होता. हे विचारात घेऊन मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांनी दि. ०६/०२/२०२२ रोजी इचलकरंजी, जि. कोल्हापूर येथे झालेल्या बैठकीत २७ ते २०० अश्वशक्ती पर्यंत जोडभार असलेल्या यंत्रमाग धारकांची

HB-2391 750 प्रति

दि. २९/१२/२०२१ रोजीच्या पत्राद्वारे बंद करण्यात आलेली वीज सवलत पुन्हा सुरू करण्याची घोषणा केली होती. त्यास अनुसरून शासन पत्र दि.०७/०२/२०२२ अन्वये सदर प्रकल्पांची वीज सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सदर निर्देशानुसार माहे फेब्रुवारी २०२२ च्या देयकापासून स्थगित केलेली सवलत पुर्ववत करण्यात आली. सद्यस्थितीत वस्त्रोद्योग ग्राहकांची सवलत स्थगित करण्यात आलेली नाही.

शासनाच्या प्रचलित धोरणानुसार यंत्रमाग ग्राहकांना वीज दरात सवलत देण्यात येत आहे. वस्त्रोदयोग धोरण २०१८-२३ अंतर्गत शासन निर्णय दि. २१/१२/२०१८ अन्वये यंत्रमागधारक ग्राहकांना वीज दरात सवलत देण्यात येत आहे.

महावितरण कंपनीतर्फे माहे मार्च, २०२१ अखेर प्रलंबित मागणी रू.७२०.७२ कोटी व सन २०२१-२२ करिता अंदाजित मागणी रू.१५०१ कोटी अशी एकूण रु.२२२१.७२ कोटीची मागणी शासनास सादर केली होती. त्यापैकी शासनातर्फे रू.१३५० कोटी इतका नियतव्यय अर्थसंकल्पीत करण्यात आला असून आतापर्यंत रू.९४९.८० कोटी निधी महावितरण कंपनीस वितरीत करण्यात आला आहे. सबब, अद्याप मंजूर तरतूदीपैकी रू.४००.२० कोटी व शासनातर्फे करावयाची उर्वरीत तरतूद रू.८७१.७२ कोटी अशी एकूण रू.१२७१.९२ कोटी शासनाकडून महावितरण कंपनीस येणे बाकी आहे. तथापि, सन २०२१-२२ करीता जानेवारी, २०२२ अखेर ग्राहकास प्रत्यक्षात रू.१०७५.७९ कोटी सवलत देण्यात आली आहे.

त्यामुळे मार्च २०२१ अखेर प्रलंबित मागणी रू.७२०.७२ कोटी व सन २०२१-२२ (माहे जानेवारी, २०२२ अखेर) ग्राहकास प्रत्यक्ष अदा करण्यात आलेली रक्कम रू.१०७५.७९ कोटी अशी एकूण रू.१७९६.५१ कोटी पैकी शासनातर्फे रू.९४९.८० कोटी वजा जाता रू.८४६.७१ कोटी एवढी सवलत ग्राहकांस शासनाकडून महावितरण कंपनीस प्रत्यक्ष निधी उपलब्ध होण्याआधीच अदा करण्यात आलेली आहे.

*************************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**सर्वश्री. सुनिल प्रभु व दिलीपराव बनकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

**"नाशिक तिर्थक्षेत्र ठिकाणच्या पवित्र गोदावरी नदीमध्ये दररोज ३५ ते ४० लाख लिटर सांडपाणी प्रक्रिया न करताच सोडले जात असल्याने गुणवत्तेच्या निकषानुसार सदरचे पाणी मनुष्य आणि प्राण्यांना पिण्यासाठी व आरोग्यासाठी योग्य नसून त्यांच्या आरोग्यावर घातक परिणाम होत असल्याचे राष्ट्रीय हरित लवादाने दि. १६.०२.२०२२ रोजी गंभीर इशारा देणे, गोदावरी नदीत दर दिवशी ४५ ते ५० लाख लिटर सांडपाणी तयार होऊन त्यापैकी केवळ १० लाख लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची व्यवस्था असणे, यामुळे दररोज ४० लाख लिटर सांडपाणी प्रक्रिया न करताच नदीमध्ये सोडले जात असल्याने नदीचे पाणी मोठ्या प्रमाणात प्रदुषित होऊन आरोग्यास घातक व हानीकारक असणे, सन २०१७ च्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही सांडपाणी रोखण्यासाठी काहीच कारवाई न झाल्याने शासन तथा संबंधित अधिकाऱ्यांच्या अमानवी वर्तनाबद्दल तीव्र संताप व्यक्त करण्यात येणे, प्रत्यक्षात प्रदुषाला जबाबदार असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर आतापर्यंत केवळ शिस्तभंगाच्या कारवाईची केवळ औपचारिकता करुन त्यांना कारवाई पासून शासनाकडून मिळालेले अभय, यामुळे देशाच्या कानाकोपऱ्यातून योणारे लाखो भाविक आणि स्थानिक नागरीकांच्या आरोग्यास निर्माण झालेला गंभीर धोका, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील नागरीकांमध्ये निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावायची कार्यवाही व उपाययोजना."**

## -: मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-

त्र्यंबक शहरात गोदावरी नदीचा उगम असून शहरामध्ये गोदावरी नदीचे स्वरुप अत्यंत छोटे असून यामध्ये पाण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. तसेच नगरपरिषद क्षेत्रात सदर नदीचे अंतर मात्र ४ ते ५ कि.मी. इतकी आहे. नगरपरिषदेच्या तत्कालीन सन २००१ च्या जनगणनेनुसार १ एम.एल.डी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया केंद्र सन २००३ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत बांधण्यात आला.मात्र वाढती लोकसंख्या व वाढते क्षेत्रफळ यामुळे सदरची क्षमता ही कमी पडत असल्याने उर्वरित सांडपाण्यामुळे गोदावरी नदी प्रदूषित होते म्हणुन मा. राष्ट्रीय हरित लवादाकडे अर्ज करण्यात आलेला होता. सद्यस्थितीस नगरपरिषदेने ४.५ एम.एल.डी वाढीव क्षमतेचा सांडपाणी

प्रक्रिया केंद्र व भुयारी गटार प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला असून सद्यस्थितीस सदर प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच, नाशिक महानगरपालिका क्षेत्रात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मापदंडानुसार मलनिस्सारण प्रक्रिया करण्यात येत आहे. तसेच, सद्यस्थितीस ३५० ते ३६० एम.एल.डी इतक्या सांडपाण्यावर नाशिक महानगरपालिकेमार्फत प्रक्रिया करण्यात येत आहे.

नाशिक महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेले गंगापूर व पिंपळगाव येथील एकूण ५० एम.एल.डी क्षमतेच्या एसटीपीमध्ये सद्यस्थितीस सीपीसीबी तसेच एमपीसीबी यांनी निश्चित केलेल्या मापदंडानुसार प्रक्रिया केली जाते व प्रक्रिया केलेले सांडपाणी नदीमध्ये सोडण्यात येते.

परंतु, नाशिक महानगरपालिकेने बांधलेले तपोवन, पंचक, आगरटाकळी व चेहडी या ठिकाणी बांधलेल्या एसटीपीमध्ये नाशिक महानगरपालिकेने सुधारणा प्रस्तावित केली असून त्यानुषंगाने राज्यनदी संवर्धन योजनेंतर्गत सदर कामे घेण्याची महानगरपालिकेची कार्यवाही सुरु आहे.

गोदावरी नदीत प्रदुषण होऊ नये व त्याचे संनियंत्रण करणेसाठी नाशिक महानगरपालिकेने स्वतंत्र गोदावरी संवर्धन कक्ष स्थापन केला आहे. नदी कायम स्वच्छ राहण्यासाठी दैनंदिन स्वच्छता करण्यात येत आहे. नदीपात्रातील पानवेली तसेच वाहता घनकचरा काढणेसाठी Trash Skimmer मार्फत मनपा हद्दीतील गोदावरी नदीपात्रातील पानवेली तसेच वाहता कचरा काढणे, महत्वाच्या ठिकाणी निर्माल्य कुंड ठेवणे, घाट परिसरात सुरक्षागार्डांची नेमणूक इ. अशा अनेक उपाययोजना महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत आहेत.

तसेच, गोदावरी नदीत प्रदुषण कमी करण्याच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिनांक १२ डिसेंबर, २०१८ च्या निर्देशानुसार विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीमार्फत त्रैमासिक आढावा बैठक घेण्यात येते व गोदावरी नदीचे प्रदुषण कमी करण्याच्या अनुषंगाने समितीच्या निर्देशानुसार कामकाज करण्यात येते.

तसेच, गोदावरी नदीमधील प्रदूषणाच्या अनुषंगाने मा. हरित लवादात दाखल याचिका मा. हरित लवादामार्फत निकाली काढण्यात आलेली आहे. व गोदावरी नदीमधील प्रदुषण कमी करण्याच्या अनुषंगाने त्र्यंबक नगरपरिषद व नाशिक महानगरपालिकेमार्फत दीर्घ मुदतीच्या व तातडीच्या उपाययोजना हाती घेण्यात आलेल्या आहेत. यासाठी केंद्र शासनाच्या निरी या संस्थेच्या मार्गदर्शनानुसार गोदावरी नदीपात्र स्वच्छ व प्रदुषण मुक्त करण्यासाठी सर्वतोपरी उपाययोजना आखण्यात येत आहेत.



*****